Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 7TH APRIL 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १८९८ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९८ चा आक्ट ३ रा.

**भिक्षेकरी रक्तपित्यांना इतर लोकांपासून निराळें ठेवून औषधोपचार करण्याची आणि कित्येक धंदे करणाऱ्या रक्तपित्यांवर निर्बंध ठेवण्याची तजवीज करण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थीं भिक्षेकरी रक्तपित्यांना इतर लोकांपासून निराळे ठेवून औषधोपचार करण्याची आणि कित्येक धंदे करणाऱ्या रक्तपित्यांवर निर्बंध ठेवण्याची तजवीज करणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं सांगितल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :-

१. (१) या आक्टास सन १८९८ चा रक्तपित्यांबाबद आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरवात.

(२) तो उत्तर ब्रह्मदेश, ब्रिटिश बलुचिस्थान, संताल परगणे व स्पिटी परगणा हे धरून सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे ; परंतु

(३) तो त्याच्या कोणत्याहि भागांत, त्या भागास तो लागू केला आहे असें स्थानिक सरकार यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें ठरवी तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं.

(४) स्थानिक सरकार, सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, हा आक्ट किंवा याचा कोणताहि भाग त्या त्या काळीं आपल्या कारभाराखालीं असणाऱ्या सगळ्या मुलुकांस किंवा त्या मुलुकांच्या कोणत्याहि भागास लागू करण्यास, आणि त्याच रीतीनें असा कोणताहि जाहिरनामा सुधारण्यास किंवा रद्द करण्यास मुखत्यार आहे.

२. या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येण्यासारखें कांहीं नसेल तर,- व्याख्या.

(१) "रक्तपित्या" ह्मणजे ज्या कोणत्याहि मनुष्यास कोणत्याहि प्रकारची रक्तपिती झाली असून ज्याच्या अंगास क्षतें पडण्यास सुरुवात झाली असेल तो मनुष्य ;

(२) "भिक्षेकरी रक्तपित्या" ह्मणजे असा रक्तपित्या कीं—

(अ) जो उघडपणें भिक्षा मागत असेल, किंवा दया आणण्याच्या अगर भिक्षा मिळविण्याच्या उद्देशानें कोणतीहि क्षतें, जखमा, शारीरिक व्याधि अथवा कुरूपता उघडी टाकील अगर दाखवील, किंवा

(ब) जो उपजीविकेच्या कोणत्याहि दिसत्या साधनावांचून मोकळा फिरत असेल;

(३) "रक्तपित्यांचें आश्रयस्थान" याचा अर्थ, ३ ऱ्या कलमाअन्वयें नेमलेलें रक्तपित्यांचें आश्रयस्थान असा आहे;

(४) "बोर्ड" याचा अर्थ, ५ व्या कलमाअन्वयें रचलेला बोर्ड असा आहे; आणि

(५) "जिल्हा माजिस्ट्रेट" या संज्ञेंत चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटाचा समावेश होतो.

स्थानिक सरकारनें रक्तपित्यांचीं आश्रयस्थानें नेमण्याबावत.

३. स्थानिक सरकार, सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, कोणतीहि जागा या आक्टाच्या कारणांसाठीं रक्तपित्यांचें आश्रयस्थान ह्मणून नेमण्यास, व अशा आश्रयस्थानास कोणकोणत्या स्थानिक प्रदेशांतून रक्तपित्यांना पाठवितां येईल तें निर्दिष्ट करण्यास मुखत्यार आहे, आणि, त्याच रीतीनें, अशा कोणत्याहि जाहिरनाम्यांत फेरबदल करण्यास किंवा तो रद्द करण्यास मुखत्यार आहे.

रक्तपित्यांचे इन्स्पेक्टर व आश्रयस्थानांचे सुपरिंटेंडेंट नेमण्याबावत.

४. १६ व्या कलमाअन्वयें ज्या कोणत्याहि कानू करण्यांत येतील त्यांस पात्र राहून, स्थानिक सरकार, आपणास जरूर वाटेल तेवढ्या एस्टाब्लिशमेंटानिशीं, सरकारच्या कोणत्याहि वैद्यकीय अमलदारास किंवा इतर लायक वैद्यकीय मनुष्यास रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर ह्मणून व कोणत्याहि मनुष्यास रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाचा सुपरिंटेंडेंट ह्मणून नेमण्यास मुखत्यार आहे, आणि याप्रमाणें नेमलेला प्रत्येक इन्स्पेक्टर किंवा सुपरिंटेंडेंट हा सरकारी नोकर आहे असें समजलें पाहिजे.

बोर्डाची रचना.

५. ३ ऱ्या कलमाअन्वयें नेमलेल्या दरेक रक्तपित्यांच्या आश्रयस्थानासाठीं स्थानिक सरकारानें तिहींहून कमी नाहींत इतक्या सभासदांच्या एका बोर्डाची रचना केली पाहिजे व त्यांपैकीं निदान एक सभासद सरकारचा वैद्यकीय अमलदार असला पाहिजे.

भिक्षेकरी रक्तपित्यांना धरण्याबाबत.

६. (१) ३ ऱ्या कलमाअन्वयें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि स्थानिक प्रदेशाच्या आंत कोणताहि पोलीस अमलदार, जो कोणताहि मनुष्य भिक्षेकरी रक्तपित्या आहे असें त्यास दिसेल त्या मनुष्यास, वारंटावांचून धरण्यास मुखत्यार आहे.

(२) अशा पोलीस अमलदारानें तावडतोब, याप्रमाणें धरलेल्या मनुष्यास अगदीं जवळच्या सोईवार पोलीस-ठाण्यास घेऊन गेलें पाहिजे किंवा पाठविलें पाहिजे.

धरलेल्या मनुष्याची कशी व्यवस्था करावी.

७ सदरील शेवटच्या कलमाअन्वयें पोलीस ठाण्यास आणलेल्या प्रत्येक मनुष्यास, विनाकारण विलंब न लावतां, रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरापुढें घेऊन गेलें पाहिजे, व त्या इन्स्पेक्टरास—

(अ) असा मनुष्य २ ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें रक्तपित्या नाहीं असें आढळून आल्यास, त्यानें त्या मनुष्याला परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें एक दाखला दिला पाहिजे; आणि मग लगेच अशा मनुष्याला अटकेंतून सोडून दिलें पाहिजे;

(ब) असा मनुष्य २ ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें रक्तपित्या आहे असें आढळून आल्यास, त्यानें ज्या पोलीस अमलदाराच्या रखवालींत तो रक्तपित्या असेल त्या पोलीस अमलदाराला परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें एक दाखला दिला पाहिजे; आणि मग त्या रक्तपित्यास, विनाकारण विलंब न लावतां, या आक्टाअन्वयें हुकुमत असणाऱ्या माजिस्ट्रेटापुढें घेऊन गेलें पाहिजे.

भिक्षेकरी रक्तपित्यांच्या संबंधानें काम चालविण्याची रीति.

८. (१) जर कोणत्याहि प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास किंवा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास, अगर स्थानिक सरकारानें या बाबतींत अधिकार दिलेल्या इतर कोणत्याहि माजिस्ट्रेटास, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें दिलेल्या दाखल्यावरून, कोणताहि मनुष्य रक्तपित्या आहे असें दिसून येईल तर, व जर तो मनुष्य भिक्षेकरी रक्तपित्या आहे असें आणखी त्या माजिस्ट्रेटास दिसून येईल तर, तो माजिस्ट्रेट, वर सांगितलेल्या मुद्यांवरील पुरावा व त्यावर आपला हुकुम त्यानें लिहून ठेविल्यानंतर, त्या भिक्षेकरी रक्तपित्यास एकाद्या पोलीस अमलदाराच्या ताब्यांत देऊन, परिशिष्टांत नमूद केलेल्या क नमुन्याप्रमाणेंच्या हुकुमासहित, एकाद्या रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविण्यास मुख्त्यार आहे, व अशा रक्तपित्यास बोर्डाच्या किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमानें सोडून देण्यांत येई तोंपर्यंत तेथें अटकावून ठेवला पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, आपण रक्तपित्या नाहीं असें जर सदरहू मनुष्याचें ह्मणणें असेल तर माजिस्ट्रेटानें रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरास बोलावून त्याची जबानी घेतली पाहिजे, व तो मनुष्य रक्तपित्या आहे असें जें ह्मणणें असेल त्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ किंवा निरसनार्थ जरूर असेल तो आणखी पुरावा घेतला पाहिजे, आणि या कारणासाठीं तो वेळोवेळीं, त्या मनुष्यावर नजर ठेवण्याकरितां किंवा इतर कारणाकरितां सोईवार असेल त्या जागीं त्यास पाठवण्याविषयीं हुकूम करून किंवा त्यास जामिनावर सोडून, चौकशी पुढल्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्यास मुख्त्यार आहे :

मात्र असेंहि आणखी ठरविण्यांत येतें कीं, जो कोणताहि मनुष्य भिक्षेकरी रक्तपित्या असल्याचें आढळून आलें असेल त्या मनुष्याचा कोणताहि मित्र किंवा नातेवाईक जर त्या भिक्षेकरी रक्तपित्याची योग्य प्रकारें काळजी घेण्याचा व त्यास ३ ऱ्या कलमाअन्वयें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि प्रदेशांत उघडपणें भिक्षा मागूं न देण्याचा माजिस्ट्रेटाच्या खातरीलायक लेख करून देऊन पतकर घेईल तर माजिस्ट्रेट, त्या रक्तपित्यास एकाद्या आश्रयस्थानास पाठविण्याच्याबदला, त्या रक्तपित्यास अशा मित्राच्या किंवा नातेवाईकाच्या हवालीं करण्यास, आणि त्यास योग्य वाटल्यास त्या मित्राला किंवा नातेवाईकाला, फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा याच्या ५१४ व्या कलमांतील ठराव ज्यास लागू होतील असें एका किंवा अधिक जामिनांनिशीं खत लिहून देण्याविषयीं फर्माविण्यास मुख्त्यार आहे.

(२) जर माजिस्ट्रेटास असा मनुष्य रक्तपित्या नाहीं असें, किंवा तो रक्तपित्या असल्यास भिक्षेकरी रक्तपित्या नाहीं असें आढळून येईल, तर त्यानें त्याला ताबडतोब सोडून दिलें पाहिजे.

रक्तपित्यांना कित्येक धंदे करण्याची व कित्येक कृत्यें करण्याची मनाई करण्याचा अधिकार.

९. (१) स्थानिक सरकार, सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, असा हुकुम करण्यास मुख्त्यार आहे कीं कोणत्याहि रक्तपित्यानें, ३ ऱ्या कलमाअन्वयें निर्दिष्ट करण्यांत आलेल्या कोणत्याहि प्रदेशाच्या आंत,—

(अ) मनुष्याच्या उपयोगासाठीं योजलेला कोणताहि खाण्याचा अगर पिण्याचा पदार्थ, किंवा तशीं कोणतींहि औषधी द्रव्यें अगर कपडालत्ता जातीनें विक्रीसाठीं तयार करूं नये किंवा विकूं नये; किंवा

(ब) ज्या कोणत्याहि सार्वजनिक विहिरीचा किंवा तलावाचा उपयोग करण्यास कोणत्याहि म्युनिसिपल किंवा स्थानिक पोट-कायद्यावरून रक्तपित्यांना प्रतिबंध केला असेल त्या विहिरींत किंवा तलावांत स्नान करूं नये, चिरगुटें धुवूं नयेत, अगर त्यांतून पाणी घेऊं नये; किंवा

(क) रेल्वेची गाडी खेरीज करून इतर कोणतीहि भाड्यानें जाणायेणारी सार्वजनिक गाडी हांकूं नये, चालवूं नये किंवा तींतून जाऊं नये; किंवा

(ड) सदरहू जाहिरनाम्यावरून जो कोणताहि व्यापार किंवा धंदा चालविण्याची रक्तपित्यांना मनाई केली असेल तो व्यापार किंवा धंदा चालवूं नये.

(२) अशा कोणत्याहि जाहिरनाम्यांत सदरहू सर्व किंवा कोणत्याहि मनाईच्या बाबतींचा समावेश करण्याचा अधिकार आहे.

(३) जो कोणी या कलमावरून दिलेल्या अधिकारांस अनुसरून केलेला कोणताहि हुकुम न पाळील तो पराकाष्ठा वीस रुपयेपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईलः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जेव्हां कोणत्याहि मनुष्यावर या कलमाअन्वयें एकाद्या अपराधाचा आरोप आणला असेल, तेव्हां ज्या माजिस्ट्रेटापुढें त्याजवर आरोप आणला असेल त्या माजिस्ट्रेटानें त्यास रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टराकडून तपासविला पाहिजे, आणि अशा इन्स्पेक्टरानें अशा मनुष्याच्या संबंधानें, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें, दाखला दिल्याशिवाय, त्या खटल्यासंबंधी काम चालवितां कामा नये.

पूर्वी अपराधाच्या शाबितीचा ठराव झालेला असून पुनः अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यास.

१०. (१) जेव्हां जेव्हां, सदरील शेवटल्या कलमाअन्वयें शिक्षा होण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव ज्या कोणत्याहि रक्तपित्यावर झाला असेल त्याजवर त्या कलमाअन्वयें शिक्षा होण्याजोगा कोणताहि अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव पुनः होईल तेव्हां तेव्हां माजिस्ट्रेट, असा रक्तपित्या ज्या कोणत्याहि शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेखेरीज आणखी किंवा त्या शिक्षेऐवजीं, ३ ऱ्या कलमाअन्वयें निर्दिष्ट केलेल्या ज्या स्थानिक प्रदेशांत तो असेल त्या प्रदेशांतून ताबडतोब निघून जाण्याबद्दल, व परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर त्यास दाखला देईपर्यंत त्या किंवा सदरहूप्रमाणें निर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याहि स्थानिक प्रदेशांत न जाण्याबद्दल ज्यावरून तो बांधला जाईल असें एका किंवा अधिक जामिनांनिशीं खत लिहून देण्याविषयीं त्याला फर्माविण्यास मुखत्यार आहे.

(२) जर असा कोणताहि रक्तपित्या पोट-कलम (१) अन्वयें देण्याविषयीं फर्माविलेलें कोणतेंहि तारणखत देण्यास चुकेल, तर तो माजिस्ट्रेट त्याला एकाद्या पोलीस अमलदाराच्या ताब्यांत देऊन, परिशिष्टांत नमूद केलेल्या ड नमुन्याप्रमाणेंच्या हुकुमासहित, एकाद्या रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविण्यास मुखत्यार आहे; व अशा रक्तपित्यास, बोर्डाच्या किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमानें सोडून देण्यांत येई तोंपर्यंत, तेथें अटकावून ठेवला पाहिजे.

(३) या कलमावरून दिलेले अधिकार फक्त प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें किंवा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें चालविले पाहिजेत.

मनाई केलेल्या व्यापारांत रक्तपित्यांना कामास लावणाऱ्या मनुष्यास शिक्षा.

११. जो कोणताहि मनुष्य, ३ ऱ्या कलमाअन्वयें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि प्रदेशांत, ९ ऱ्या कलमाअन्वयें हुकुम करून मनाई केलेल्या कोणत्याहि व्यापारांत किंवा धंद्यांत एकाद्या रक्तपित्यास जाणूनबुजून कामास लावील, तो मनुष्य पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जो मनुष्य रक्तपित्या आहे असें ह्मणणें असेल त्यास माजिस्ट्रेटापुढें हजर केलें पाहिजे, आणि त्या माजिस्ट्रेटानें त्यास रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टराकडून तपासविलें पाहिजे, आणि अशा इन्स्पेक्टरानें रक्तपित्या आहे असें ह्मटलेल्या सदरहू मनुष्याच्या संबंधानें, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें, दाखला दिल्याशिवाय, त्या खटल्यासंबंधी काम चालवितां कामा नये.

पळालेल्या रक्तपित्यांना पुनः धरण्याबाबत.

१२. जो कोणी, परिशिष्टांत नमूद केलेल्या क नमुन्याप्रमाणें किंवा ड नमुन्याप्रमाणें माजिस्ट्रेटानें दिलेल्या हुकुमाअन्वयें रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविण्यांत आला असून, त्या आश्रयस्थानाच्या सुपरिंटेंडेंटाच्या लेखी परवानगीवांचून त्यांतून पळून

जाईल किंवा तें सोडून जाईल, त्याला कोणताहि पोलीस अमलदार वारंटावांचून धरण्यास मुखत्यार आहे, आणि धरल्यावर त्याला तावडतोब सदर्हू रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास परत घेऊन गेलें पाहिजे.

१३. बोर्डाचे दोन किंवा अधिक समासद— यांपैकीं एकजण वैद्यकीय अमलदार असला पाहिजे–यांनीं एकत्र मिळून, रक्तपित्यांच्या ज्या आश्रयस्थानासाठीं बोर्डाची रचना केलेली असेल त्या आश्रयस्थानाची, प्रत्येक तीन महिन्यांमध्यें निदान एकदा तरी, पाहणी केली पाहिजे, आणि (अ) मागें शेवटीं पाहणी करण्यांत आली तेव्हांपासून त्यांत घेतलेल्या प्रत्येक रक्तपित्यास, त्यास घेण्याबद्दलच्या हुकुमासुद्धां, आणि (ब) बनूं शकेल तेथवर, त्यांतील इतर प्रत्येक रक्तपित्यास पाहून तपासलें पाहिजे, आणि त्या आश्रयस्थानाची व त्यांतील रक्तपित्यांची व्यवस्था व स्थिति यांच्या संबंधानें त्यांना योग्य वाटेल तो कोणताहि अभिप्राय नोंदण्याच्या कारणासाठीं ठेवलेल्या बुकांत त्यांनीं तो नोंदला पाहिजे. बोर्डाकडून पाहणी.

१४. बोर्डाचे कोणतेहि दोन समासद—यांपैकीं एकजण वैद्यकीय अमलदार असला पाहिजे—यांना कोणत्याहि वेळीं, परिशिष्टांत नमूद केलेल्या ड नमुन्याप्रमाणें आपल्या सहीचा लेखी हुकुम काढून, या आक्टाच्या ठरावांअन्वयें रक्तपित्यांच्या आश्रयस्थानांत अटकावून ठेवलेल्या कोणत्याहि रक्तपित्यास त्यांतून सोडून देण्याविषयीं फर्मावि याचा अखत्यार आहे. बोर्डानें सोडून देण्याचा हुकूम करण्याबाबत.

१५. भिक्षेकरी रक्तपित्या खेरीज करून इतर ज्या कोणत्याहि मनुष्याच्या संबंधानें रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरानें तो मनुष्य रक्तपित्या असल्याबद्दलचा परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें दाखला दिला असेल, किंवा परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें दाखला देण्यास नाकारलें असेल तो मनुष्य, असा कोणताहि दाखला दिल्याच्या विरुद्ध किंवा देण्यास नाकारल्याच्या विरुद्ध, या बाबतींत स्थानिक सरकार नेमील त्या अमलदाराकडे अपील करण्यास मुखत्यार आहे, आणि अशा अमलदारानें केलेला निकाल अखेरचा असेल असें समजावें. अपिलें.

१६. स्थानिक सरकारास, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, साधारणतः या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं, आणि विशेषेंकरून— कानू करण्याचा स्थानिक सरकारचा अधिकार.

(अ) या आक्टाअन्वयें कोणतेंहि काम करणाऱ्या अमलदारांपैकीं सर्व किंवा कोणत्याहि अमलदारांच्या समजुतीसाठीं, आणि

(ब) रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाच्या व्यवस्थेसाठीं व त्यांत शिस्त राहण्यासाठीं,

कानू करण्याचा अखत्यार आहे.

१७. स्थानिक अधिकाऱ्याचे फंड किंवा इतर मिळकत ज्या कामांस लावण्याचा अधिकार असेल त्या कामांच्या संबंधानें कोणत्याहि कायद्यांत कसाहि ठराव असला, तथापि कोणताहि स्थानिक अधिकारी— फंड खर्च करण्याचा, व आश्रयस्थानांकडे मिळकतीचा विनियोग करण्याचा, स्थानिक अधिकाऱ्यांस अधिकार.

(अ) अशा स्थानिक अधिकाऱ्याच्या स्थानिक हद्दींच्या आंत किंवा बाहेर एखादें रक्तपित्यांचें आश्रयस्थान स्थापन करण्यास किंवा चालू ठेवण्यास, अगर तें स्थापन करून चालू ठेवण्यास, अगर तें स्थापन करण्याच्या किंवा चालू ठेवण्याच्या अथवा तें स्थापन करून चालू ठेवण्याच्या खर्चास वर्गणी देण्यास,

(ब) स्थानिक सरकारची पूर्वी मंजूरी घेऊन आणि तें सरकार ठरवील त्या शर्तींस पात्र राहून, अशा मंडळीमध्यें निविष्ट झालेल्या किंवा तिच्या निर्बंधाखालीं असलेल्या कोणत्याहि स्थावर मिळकतीचा, रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाच्या जागेप्रमाणें, किंवा तशा आश्रयस्थानादाखल उपयोग करण्याकडे, विनियोग करण्यास,

मुखत्यार आहे.

आक्टाअन्वयें इमानें इतबारें काम करणाऱ्या मनुष्यांचें संरक्षण.

१८. या आक्टाच्या ठरावांअन्वयें किंवा त्यांच्या अनुरोधानें इमानें इतबारें केलेल्या किंवा करावयाचा इरादा असलेल्या कोणत्याहि कृत्याच्या संबंधानें कोणत्याहि अमलदारावर किंवा मनुष्यावर कोणताहि दावा, फौजदारी काम किंवा इतर कायदेशीर काम चालणार नाहीं असें समजावें.

१९. [ हें कलम मुंबई इलक्यास लागू नसल्यामुळें याचा तर्जुमा केला नाहीं. ]

---

## परिशिष्ट.

### अ.—दाखला.

( कलम ७. )

मी, खालीं सही करणार ( येथें नांव व हुद्दा लिहावा ), यावरून दाखला लिहून देतों कीं मीं ( येथें तपासून पाहिलेल्या मनुष्याचें नांव लिहावें ) यास तारीख माहे सन रोजीं येथें जातीनें तपासून पाहिलें, व सदरहू हा, सन १८९८ च्या रक्तपित्यांबाबतच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें, रक्तपित्या नाहीं.

माझ्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

( सही. )

रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर.

---

### ब.—दाखला.

( कलम ७.)

मी, खालीं सही करणार ( येथें नांव व हुद्दा लिहावा ), यावरून दाखला लिहून देतों कीं मीं ( येथें रक्तपित्याचें नांव लिहावें ) यास तारीख माहे सन रोजीं येथें जातीनें तपासून पाहिलें, आणि सदरहू हा, सन १८९८ च्या रक्तपित्यांबाबतच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें, रक्तपित्या आहे, आणि मीं हा अभिप्राय खालील कारणांवरून दिला आहे. तीं येणेंप्रमाणें :—

( येथें कारणें लिहावीं. )

माझ्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सही.)

रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर.

---

### क.—अटकावून ठेवण्याचें वारंट.

( कलम ८. )

————————येथील रक्तपित्यांचें आश्रयस्थान याचे सुपरिंटेंडेंट यांस.

ज्याअर्थीं ( नांव व वर्णन ) हा, सन १८९८ च्या रक्तपित्यांबाबतच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें भिक्षेकरी रक्तपित्या असल्याचें माझ्या नजरेस आणलें आहे:

त्याअर्थीं यावरून, तुह्मी सदरहू सुपरिंटेंडेंट, यांस अधिकार देण्यांत येत आहे कीं तुह्मी सदरहू याला/हिला या हुकुमासह आपल्या रखवालींत घ्यावें, आणि त्याला/तिला बोर्डाच्या किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरून सोडून देण्यांत येई तोंपर्यंत त्याला/तिला सदरहू आश्रयस्थानांत संभाळून ठेवावें.

माझ्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें असे, आज तारीख माहे सन १८९ .

(शिक्का.)

( सही. )

माजिस्ट्रेट.

## ड.—अटकावून ठेवण्याचें वारंट.

(कलम १०.)

———————येथील रक्तपित्यांचें आश्रयस्थान याचे सुपरिंटेंडेंट यांस.

ज्याअर्थी आज रोजीं (नांव व वर्णन) याजवर/हिच्यावर माझेकडून, सन १८९८ च्या रक्तपित्यांबाबतच्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव करण्यांत आला आहे, आणि ज्याअर्थी सदरहू (नांव व वर्णन) याजवर/हिच्यावर, त्याच कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव पूर्वी झाला होता असें माझ्यापुढें शाबीत करण्यांत आलें आहे :

त्याअर्थी यावरून, तुह्मी सदरहू सुपरिंटेंडेंट, यांस अधिकार देण्यांत येत आहे कीं तुह्मी सदरहू याला/हिला या हुकुमासह आपल्या रखवालींत घ्यावें, आणि त्याला/तिला बोर्डाच्या किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरून सोडून देण्यांत येई तोंपर्यंत त्याला/तिला सदरहू आश्रयस्थानांत संभाळून ठेवावें.

माझ्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्कयानिशीं दिलें असे, आज तारीख माहे सन १८९ .

(शिक्का)

(सही.)

माजिस्ट्रेट.

---

## इ.—सोडून देण्याबद्दल बोर्डाचा हुकुम.*

(कलम १४.)

———————येथील रक्तपित्यांचें आश्रयस्थान याचे सुपरिंटेंडेंट यांस.

ज्याअर्थी (नांव व वर्णन) याला/हिला, तारीख माहे सन १८९ च्या हुकुमाअन्वयें तुमच्या रखवालींत दिलें होतें व ज्याअर्थी त्याला/तिला सोडून दिलें असतां लोकांस धोका किंवा गैरसोय होणार नाहीं असें वाटण्यास आह्मास पुरतीं कारणें दिसून आलीं आहेत :

त्याअर्थी यावरून तुह्मांस अधिकार देऊन फर्माविण्यांत येतें कीं तुह्मी सदरहू (नांव) याला/हिला आपल्या रखवालींतून ताबडतोब सोडून द्यावें.

आमच्या सह्यांनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सह्या)

आश्रयस्थान-बोर्डाचे सभासद.

---

* कलम १० (२) अन्वयें करावयाच्या सोडून देण्याबद्दलच्या हुकुमासाठीं जिल्हा माजिस्ट्रेटानें यासारख्याच नमुन्याचा उपयोग करावा.

जे. एम्. म्याक्फर्सन,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.